पुढारी 20/10/2012

# राज्यस्तरीय बेसबॉल स्पर्धेत कमला कॉलेज विजयी

कोल्हापूर : प्रतिनिधी

राज्यस्तरीय १९ वर्षांखालील मुलींच्या बेसबॉल स्पर्धेतील अतिटीच्या झालेल्या अंतिम सामन्यात कमला कॉलेज संघाने सोलापूर संघाचा पराभव करून विजय मिळविला. या स्पर्धा चाळीसगाव येथे पार पडल्या.

तत्पूर्वी झालेल्या सामन्यात कमला कॉलेजच्या संघाने लातूर विभाग संघावर १२-० अशी मात करून उपांत्यफेरीत प्रवेश केला. त्यानंतर नाशिक विभागकडून आलेल्या चाळीसगाव संघाबरोबर झालेल्या सामन्यात ६-१ असा विजय मिळविला. अंतिम सामन्यात पुणे विभागाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या गतविजेत्या सोलापूर संघाबरोबर चुरशीच्या लढतीत सोलापूर संघास २-१ असे नमवून अजिंक्यपद पटकविले. तेजस्वीनी पाटील व रोहिणी माळी यांची गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली. विजयी संघ पुढीलप्रमाणे, कर्णधार रोहिणी माळी, माधुरी दांगट, सुस्मिता पाटील, तेजस्विनी पाटील, रसिका शिरगावे, भारती दांगट, प्राजक्ता चौगुले, अर्चना पाटील, प्रियांका गवळी, स्नेहल पडवळे, प्रियांका जाधव, सोनल हिमुते, पूजा मुदगल, प्रणिता चौगुले, धनश्री कोळी, पुजा मोरे. विजयी संघास कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांचे प्रोत्साहन तर डॉ. सुनीता काळे व क्रीडाशिक्षिका साधना माने यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : राज्यस्तरीय १९ वर्षांखालील मुलींच्या बेसबॉल स्पर्धेतील विजेता कमला कॉलेजच्या संघासमवेत कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, क्रीडाशिक्षक आदी.

पुढारी 05/08/2012

# राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेत कमला कॉलेज अजिंक्य

कोल्हापूर : प्रतिनिधी

राज्यस्तरीय १९ वर्षांखालील मुलींच्या सॉफ्टबॉल स्पर्धेत कमला कॉलेजच्या मुलींच्या संघाने अजिंक्यपद पटकावले. कमला कॉलेजच्या संघाने मुंबई विभागाचा १४-० ने मात करून उपांत्य फेरीत प्रवेश करत उपांत्य फेरीत जळगाव संघाचा ५-२ ने पराभव करून स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. अंतिम सामना अमरावती विभाग आणि कमला कॉलेज यांच्यात झाला. हा सामना कमला कॉलेजच्या संघाने २२ -१ ने एकतर्फी जिंकून स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले.

संघात सुस्मिता पाटील, रसिका शिरगावे, माधूरी दांगट, रोहिणी माळी, धनश्री कोळी, अर्चना पाटील, प्रियांका पाटील, अनिता खिलारी, तेजस्विनी पाटील, भारती दांगट, प्राजक्ता चौगुले, पूजा मोरे, नम्रता जाधव, अंजली चौगुले, मनाली कुपवाडकर, पार्वती कुंभार आदी खेळाडूंचा संघात सहभाग आहे. खेळाडूंना कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. सुनीता काळे, क्रीडाशिक्षिका साधना माने-गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : राज्यस्तरीय सॉफ्टबॉल स्पर्धेतील विजेता कमला कॉलेजचा संघ. सोबत प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, सुस्मिता पाटील, साधना माने, डॉ. सुनीता काळे, वैशाली घाटगे आदी.

क्रीडा